मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रश्नांच्या तत्काळ निवारणाचा 'करसंवाद'!

## मालमत्ताकरावरील सवलतींचा लाभ घेण्याचे करसंकलन विभागाकडून आवाहन

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी ।** करदात्यांच्या शंकांचे निरसनासाठी करसंकलन विभागाने करसंवाद उपक्रम सुरू केला. नागरिकांच्या मालमत्ता कराबाबतच्या शंका, प्रश्नांचा निपटारा होण्यासाठी शनिवार, दि. २६ ऑगस्ट रोजी पार पडलेल्या करसंवादास नागरिकांनी ऑनलाइन व ऑफलाइन स्वरूपात सहभाग नोंदवून प्रतिसाद दिला.

करसंकलन विभागाने करदात्यांबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सुरू केलेल्या 'तू करदाता, तू करविता' अभियानाबाबतचा उद्देश व स्वरूप, मालमत्ताकराच्या ऑनलाइन सवलती, मालमत्ता हस्तांतरण, विभागाचे नवे धोरण आदींबाबतच्या शंकांचे निरसन व माहिती साहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्या मार्फत देण्यात आली. यावेळी विभागाचे अधिकारी, कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

नागरिक व अधिकारी यांच्यामध्ये थेटसंवाद असा उद्देश असलेल्या करसंवादामध्ये शनिवारी विभागाने नागरिकांना विचारलेल्या प्रश्नांबाबत विभागाकडून तत्काळ माहिती पुरविण्यात आली. विभागाच्या तत्काळ मिळालेल्या माहितीमुळे नागरिकांनी मनमोकळ्या पद्धतीने विभागाचे पुढील धोरण आदी बाबतचे प्रश्न विचारण्यात आले.

करसंवादामध्ये ५० पेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग नोंदविला. करसंकलन विभागाकडून घेण्यात



आलेल्या करसंवादामध्ये विचारलेल्या प्रश्नांबाबत विभागाने दखल घेऊन केलेल्या कारवाईबाबत शनिवारी पार पडलेल्या करसंवादामध्ये नागरिकांनी विभागाचे अभिनंदन केले.

मालमत्ता करावरील ऑनलाइन चार टक्के असणारी सवलत, मालमत्ता हस्तांतरण प्रक्रियेमध्ये विभागाने आणलेली सुलभता, विलंब शुल्काबाबत शंकाचे निरसन, 'माझी मिळकत माझी आकारणी'मुळे मालमत्ता आकारणीमध्ये झालेली स्पष्टता आदींबाबतच्या प्रश्नांचे निरसन करसंवादाच्या माध्यमातून करण्यात आले.

त्याबरोबरच विभागाने घेतलेले निर्णय, शासन निर्णय, परिपत्रके आदी नागरिकांसाठी महत्त्वाच्या बाबी तत्काळ ऑनलाइन पद्धतीने प्रश्नाला उत्तर देताना त्याबाबतची माहिती नागरिकांना पुरविण्यात आली.

> "पिंपरी-चिंचवड महानगरपालिका नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी नागरिकांना उत्तम सेवा प्रदान करते. महापालिका नागरिकांना सेवा देताना करसंकलन विभाग विविध कारणांसाठी कराची आकारणी करून नागरिकांकडून करसंकलन करतो. जागरूक करदात्यांनी भरलेल्या कराचा पैसा समाजोपयोगी कामामध्ये वापरला जातो. तसेच गरजू घटकांना त्याचा फायदा होत असल्याने पालिका व करसंकलन विभाग नेहमीच करदात्यांबाबत कृतज्ञता बाळगून आहे. त्यामुळे शहराच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजाविणाऱ्या करदात्यांबाबत आम्ही 'तू करदाता, तू करविता' या अभियानातून कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.
>
> – नीलेश देशमुख,
> सहायक आयुक्त, करआकारणी व करसंकलन विभाग,

करसंकलन विभागाने चालू वर्षी पहिल्या चार महिन्यांमध्ये ५०० कोटींचा टप्पा ओलांडून करसंकलनाचा नवा विक्रम केला. सध्या सुरू असणाऱ्या योजना व सवलतींचा नागरिकांनी, सोसायट्या, संस्था अशा करदात्यांनी लाभ घेऊन आपला मालमत्ताकर भरण्याचे आवाहनही साहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्याकडून करण्यात आले.

# भक्ती शक्ती चौक : जागेसाठी अजित पवार यांना साकडे

## भक्ती-शक्ती शिवजयंती उत्सव समितीसह विविध संघटनांची मागणी

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** भक्ती शक्ती उद्यान चौकाजवळ निगडी गावठाणाला लागून असलेली एक एकर जागा शिवजयंती व अन्य उपक्रमांसाठी देण्याचा पीएमआरडीए प्रशासनाने घेतलेला निर्णय रद्द करण्यात यावा. त्याऐवजी भक्ती-शक्ती उद्यान चौकाजवळील पेठ क्रमांक २४ मधील जागा सार्वजनिक कार्यक्रमांसाठी राखीव ठेवण्यात यावी, अशा मागणीचे साकडे भक्ती-शक्ती शिवजयंती उत्सव समितीसह विविध संघटनांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शुक्रवारी (दि.२५) घातले. माजी



नगरसेवक मारुती भापकर यांच्यासह अण्णासाहेब कसबे, भाऊसाहेब आढागळे, युवराज कोकाटे, नकुल भोईर, प्रदीप पवार, धनाजी येळकर, शिवाजी साळवे, सतीश काळे, ब्रह्मानंद जाधव आदींनी उपमुख्यमंत्री पवार यांची भेट घेतली. भक्ती-शक्ती शिवजयंती उत्सव समिती, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती तसेच सामाजिक संघटना आणि संस्थांच्या प्रतिनिधींनी निगडीतील भूखंडाबाबतची मागणी उपमुख्यमंत्र्यांसमोर ठेवली. पीएमआरडीएचे महानगर आयुक्त महिवाल यांनी लोकप्रतिनिधी व विविध संस्थांच्या मागणीचा विचार करून, पेठ क्र.२१ येथील निगडी गावठाणाला लागून असलेली पीएमआरडीएच्या ताब्यातील खुली जागा क्र.९ निगडी, सर्व्हे नं.८३ मधील एक एकर (४० आर.) एवढे क्षेत्र सार्वजनिक वापरासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला १८ ऑगस्ट २०२३ रोजी हस्तांतरीत केली आहे. पीएमआरडीएने दिलेली जागा ही निगडीतील भक्ती-शक्ती शिल्पसमूह तातडीने रद्द करावा.

तसेच, आमच्या मागणीप्रमाणे भक्ती-शक्ती शिल्पालगतचा पेठ क्रमांक २४ मधील संपूर्ण भूखंड सार्वजनिक उपक्रमासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घ्यावा. जर आपण तसा निर्णय घेतला नाही तर आम्हाला पुन्हा एकदा आंदोलनाला सुरुवात करावी लागेल, असे उपमुख्यमंत्री पवार यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# पिंपरीत अजित पवारांची भाजपवर कुरघोडी!

## भ्रष्टाचाराचे आरोप झालेल्या कामांचे लेखापरीक्षण करण्याची भूमिका

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** भामा आसखेड धरणाजवळ अशुद्ध जलउपसा केंद्र बांधणे, यांत्रिकी पद्धतीने रस्ते साफसफाई, टेल्को रोड येथील रस्त्याच्या कामाबाबतचे आक्षेप, डुडुळगावातील पंतप्रधान आवास योजनेची निविदा जादा दराची असल्याच्या तक्रारी आहेत. या सर्व कामांचे माझ्या यंत्रणेकडून लेखापरीक्षण करणार असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपवर कुरघोडी केली आहे. मोशीतील ७५० खाटांच्या रुग्णालयाच्या निविदेबाबत घाई करू नये, अशी सूचनाही त्यांनी प्रशासनाला दिली.



शिवसेना-भाजप सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाल्यानंतर पवार शुक्रवारी पहिल्यांदाच पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर आले होते. तीन तास महापालिका अधिकाऱ्यांसोबत शहरातील विकासकामांबाबत आढावा बैठक घेतली. महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, की महापालिकेतील विविध कामांबाबत भ्रष्टाचाराचे आरोप झाले आहेत. त्याच्या खोलात जाणार आहे. चुकीचे काम झाल्यास कारवाई केली जाईल. तक्रारी प्रशासनाला सांगितल्या आहेत. आयुक्तांना काही प्रश्न दिले आहेत. काही कामांबाबत आमचे पदाधिकारी न्यायालयात गेले आहेत. सर्व तक्रारींची माहिती घेऊन तथ्य आहे की नाही याची चौकशी करणार आहे. महापालिका निधीतील रक्कम कोणत्या मतदारसंघात किती खर्च केली जात आहे याचा आढावा घेत आहे. सर्वच भागात विकासकामे झाली पाहिजेत. केवळ भोसरीतच विकासकामे होत असतील तर चुकीचे आहे. आता मी पुन्हा सरकारमध्ये आलो आहे. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी झपाटून काम करणार आहे. निम्याच्यावर पिंपरी-चिंचवडकर झोपले असतानाच शहरात येऊन विकासकामांची पाहणी करणार आहे.

### पवना प्रकल्पावरील बंदी उठविण्याची विनंती

» पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प गुंडाळला जाणार नाही. न्यायालयाने नेमलेल्या समितीने आठ महिने बंद पाईपलाईन आणि चार महिने नदीतून पाणी उचलावे, असा पर्याय दिला आहे. परंतु, या कामाला तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली होती. ती स्थगिती उठविण्याची मुख्यमंत्र्यांना विनंती करणार आहे. त्यानंतर महापालिका आयुक्त पुढील कारवाई करतील, असेही ते म्हणाले.

### शिवसेना खासदार, भाजप आमदारांची बैठकीकडे पाठ

» शिवसेना-भाजप सरकारचे उपमुख्यमंत्री असलेल्या पवार यांच्या प्रशासनासोबतच्या बैठकीला शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे, भाजप आमदार महेश लांडगे, अश्विनी जगताप, उमा खापरे यांनी पाठ फिरविली. मी कोणालाही बैठकीला बोलविले नव्हते, असे स्पष्टीकरण पवार यांनी दिले.

> “अविष्कार नगरी (सायन्स सिटी) या प्रकल्पासाठी ३५ एकर जागा लागत आहे. त्यासाठी केंद्र, राज्य सरकार निधी देत आहेत. शहरात एवढी जागा नाही. मुंढव्याला मोठी जागा मिळाली आहे. कमी जागेत मदत करण्यास केंद्र सरकार तयार नाही. जिथे जागा उपलब्ध होईल, तिथे हा प्रकल्प उभारला जाईल.
>
> **-अजित पवार,** उपमुख्यमंत्री

# रक्षक चौकाजवळील खूनात सरकारी पंच देण्यास टाळाटाळ!

## पालिका आणि जलसंपदाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** रक्षक चौकाजवळ गोळीबार करून खून केल्याच्या प्रकरणात सरकारी पंच म्हणून सेवा देण्यास टाळाटाळ करणाऱ्या महापालिका, जलसंपदाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सांगवी पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे एकच खळबळ उडाली आहे. जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता आणि महापालिकेच्या करसंकलन विभागाचे सहमंडल अधिकारी यांच्या विरोधात हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्ह्याची दोषसिद्धी वाढवण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्याची पंच म्हणून सेवा घेण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाकडून घेण्यात आला आहे. मात्र, कर्मचारी / अधिकारी या आदेशाला केराची टोपली दाखवत पंच म्हणून सेवा देण्यास नकार देत आहेत. बुधवारी (दि.२३) रक्षक चौक, पिंपळे निलख येथे सागर सर्जेराव शिंदे (रा. मधुबन सोसायटी, जुनी सांगवी) या तरुणाचा गोळ्या घालून खून करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत सांगवी पोलिसांनी जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता आणि महापालिकेच्या करसंकलन विभागाचे सहमंडल अधिकारी यांना सरकारी पंच म्हणून सेवा देण्यासाठी पत्रव्यवहार केला. मात्र, नेहमीप्रमाणे अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या पत्राकडे कानाडोळा केला. त्यामुळे सांगवी पोलिसांनी शासन आदेशाचा भंग केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर भारतीय दंड संहिता १८८ नुसार गुन्हे दाखल केले आहेत. सांगवी पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे एकच खळबळ उडाली आहे.



# प्रॉपर्टीची मागणी : तरुणास मारहाण

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** प्रॉपर्टीच्या हिश्याची मागणी करत पत्नी व मेहुण्याने तरुणास बेदम मारहाण केली. ही घटना रोजी रात्री पावणे नऊ वाजताच्या सुमारास मोशी टोलनाका येथे घडली.राहुल तुकाराम सस्ते (वय ३३, रा. बारणे वस्ती, मोशी) असे मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून त्यांनी रविवारी (दि.२०) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. राहुल याची पत्नी आणि मेहुणा शैलेश दत्तात्रेय साखरे अशी आरोपींची नावे आहेत. ९ ऑगस्ट रोजी रात्री पावणे नऊ वाजताच्या सुमारास आरोपी पत्नी आणि मेहुणा फिर्यादीच्या घरी आले. फिर्यादीस प्रॉपर्टीच्या हिश्याची मागणी करत पत्नीने शिवीगाळ करत हाताने राहुल यांना मारहाण केली. तसेच किचन मधील सुरी घेऊन फिर्यादीच्या अंगावर धावून गेल्या. मोठमोठ्याने आरडाओरडा करून शिवीगाळ करत सिलेंडरकडे जाऊन पाइप काढण्याचा प्रयत्न केला. 'तुम्हा सर्वांना जाळून मारून टाकते', अशी धमकी दिली. तसेच आरोपी मेहुणा शैलेश याने शिवीगाळ करून लोखंडी रॉडने फिर्यादी राहुल यांच्या डाव्या हाताच्या कोपरावर जोरात मारून गंभीर जखमी करून डाव्या हाताच्या कोपराचे हाड फॅक्चर केले.

# प्रदीप कुरुलकरला जामीन नाहीच!

## डिलीट केलेला डाटा मिळवण्याचेही प्रयत्न

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पाकिस्तानला गोपनीय माहिती पुरवल्याच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या प्रदीप कुरुलकर याचा जामीन नाकारण्यात आला. कुरुलकर पुन्हा गुप्तचर यंत्रणांशी संपर्क करु शकतो या मुद्द्यावर एटीएसतर्फे जामीनास विरोध करण्यात आला.

'पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेला गोपनीय माहिती पुरविल्याच्या संशयावरून अटकेत असलेला डॉ. प्रदीप कुरुलकर यास जामीन दिल्यास तो पुन्हा गुप्तचर यंत्रणेशी संपर्क साधेल तसेच साक्षीदारांवर दबाव टाकेल,' असा युक्तिवाद करून राज्य दहशतवाद विरोधी पथकातर्फे (एटीएस) कुरुलकरच्या जामिनास शुक्रवारी विरोध करण्यात आला. आता जामीन अर्जावर २९ ऑगस्टला सुनावणी होणार आहे.

'संशोधन व विकास संस्थे'चा (आर अँड डीई-ई) तत्कालीन संचालक डॉ. प्रदीप कुरुलकर याने ॲड. ऋषीकेश गानू यांच्यामार्फत जामिनासाठी न्यायालयात अर्ज केला आहे. कुरुलकरच्या जामीन अर्जावर विशेष न्यायाधीश एस. व्ही. कचरे यांच्या न्यायालयात सुनावणी सुरू आहे. जामीन देण्यास विशेष सरकारी वकील ॲड. विजय फरगडे यांनी शुक्रवारी विरोध दर्शवला. ॲड.



फरगडे आणि कुरुलकरचे वकील ॲड. गानू यांनी लेखी म्हणणे न्यायालयात सादर केले. 'कुरुलकर याची डीआरडीओच्या समितीकडून चौकशी करण्यात आली आहे. एटीएसने कुरुलकरडून इलेक्ट्रॉनिक साहित्य जप्त केले आहे. त्यामुळे जामीन मंजूर करण्यात यावा,' अशी विनंती ॲड. गानू यांनी न्यायालयात केली. एटीएसकडून डॉ. प्रदीप कुरुलकरची १९ ते २४ एप्रिल दरम्यान प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. कुरुलकरला तीन मे रोजी अटक करण्यात आली. त्यामुळे प्राथमिक चौकशीचा अहवाल न्यायालयात दाखल करण्यात यावा, असा अर्ज ॲड. गानू यांनी दाखल केला.

### जप्त मोबाइल गुजरातच्या प्रयोगशाळेत

» 'डॉ. प्रदीप कुरुलकर याने मोबाइलचा नष्ट केलेला डेटा परत मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. कुरुलकरचा मोबाइल गुजरातमधील न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेत तांत्रिक तपासासाठी पाठवायचा आहे,' असे ॲड. फरगडे यांनी युक्तिवादात सांगितले. एटीएसकडून याबाबतचा अर्ज विशेष न्यायालयात सादर करण्यात आल्यानंतर न्यायालयाने मोबाइल तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यास परवानगी दिली.

# आता पीएमपी बसेसचं गुगलवर लाइव्ह लोकेशन!

## सप्टेंबर अखेरपर्यंत २० बसचे लाइव्ह लोकेशन प्रवाशांसाठी सुरू केले जाण्याची

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) प्रायोगिक तत्वावर २० बसमध्ये गुगल लाइव्ह यंत्रणा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची चाचणी पुढील आठवड्यात सुरू केली जाणार असून, सप्टेंबर अखेरपर्यंत २० बसचे लाइव्ह लोकेशन प्रवाशांसाठी सुरू केले जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर टप्प्या-टप्प्याने बसचे गुगलवर लाइव्ह लोकेशन कळणार आहे.



पीएमपीच्या बसचे गुगलवर लाइव्ह लोकेशन दिसावे, यासाठी गेल्या काही महिन्यांपासून प्रयत्न सुरू होते.

पीएमपीच्या बसचे गुगलवर लाइव्ह लोकेशन दिसावे, यासाठी गेल्या काही महिन्यांपासून प्रयत्न सुरू होते.

मात्र, तांत्रिक अडचणीमुळे ही सेवा सुरू होत नव्हती. पीएमपीचे अध्यक्ष सचिंद्र प्रताप सिंह यांनी पदभार घेतल्यानंतर बसचे गुगलवर लाइव्ह लोकेशन कळण्यासाठी दिसणारी सेवा सुरू करण्यासाठी पदाधिकारी व गुगलसोबत बैठक घेतली. तसेच, हे काम वेगाने करण्याच्या सूचना दिल्या.

त्यानुसार गुरुवारी पीएमपी व गुगलचे अधिकारी, ठेकेदारांचे प्रतिनिधी यांची बैठक पार पडली. आतापर्यंत चार बस गुगलवर लाइव्ह लोकेशन यंत्रणा सुरू करण्यासाठी तयार झाल्या आहेत. येत्या काही दिवसात आणखी १६ बसमध्ये ही यंत्रणा बसवून सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतर २० बसमध्ये गुगल लाइव्ह यंत्रणेची चाचणी घेतली जाईल. सप्टेंबर अखेरपर्यंत २० बस प्रवाशांसाठी गुगलवर लाइव्ह दिसतील, अशा पद्धतीने काम केले जात आहे. त्यानंतर १०० बसच्या टप्प्याने त्यादेखील गुगलवर लाइव्ह दिसण्यासाठी काम केले जाणार आहे.

> "गेल्या वर्षीपासून पीएमपीच्या बस गुगलवर लाइव्ह दिसण्याची प्रतीक्षा करीत आहेत. पण, तांत्रिक अडचणी व कंपनीकडून संथ कामामुळे ही सेवा प्रत्यक्षात येत नव्हती. अखेर गुगलसोबतचा करार रद्द करण्यापर्यंत निर्णय पीएमपीच्या अधिकाऱ्यांनी घेतला होता; पण पीएमपीच्या बस गुगलवर दिसाव्यात म्हणून प्रवासी पाठपुरावा करीत होते. त्यामुळे पीएमपीच्या नवीन अध्याक्षांनी लक्ष घालून काम वेगाने करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे लवकरच गुगलवर पीएमपीच्या बस लाइव्ह दिसणार आहेत. पीएमपीच्या बस गुगलवर लाइव्ह दिसाव्यात यासाठी पुढील आठवड्यापासून २० बसमध्ये चाचणी घेतली जाणार आहे. त्या संदर्भात गुरुवारी बैठक पार पडली. प्रवाशांसाठीदेखील लवकरच बस लाइव्ह दिसाव्यात यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
>
> -सचिंद्र प्रताप सिंग, अध्यक्ष, पीएमपी

# बारामतीमध्ये अजित पवारांचे जल्लोशात स्वागत!

## जेसीबीच्या मदतीने अनेक ठिकाणी त्यांच्यावर फुलांची उधळण

**बारामती । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** तब्बल दोन महिन्यांनंतर पहिल्यांदाच आपल्या मतदारसंघामध्ये आलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे शनिवारी बारामतीकरांनी जल्लोशात स्वागत केले. शहराच्या वेशीवर असलेल्या छत्रपती शिवाजी उद्यानापासून फुलांची उधळण करीत अजित पवार यांची उघड्या जीपमधून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. अजित पवार यांच्यासमवेत पुत्र पार्थ हेही उघड्या जीपमध्ये मतदारांचे स्वागत स्वीकारत होते. 'साहेबां'पेक्षाही 'दादां'च्या स्वागताला अधिक गर्दी झाली असल्याची चर्चा बारामतीकरांमध्ये रंगली होती. उपमुख्यमंत्रीपदाची थपथ घेतल्यानंतर अजित पवार यांचे बारामतीमध्ये पहिल्यांदाच आगमन झाले.



बारामतीकरांनी अजित पवार यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. अजित पवार यांच्यासोबत त्यांचे पुत्र पार्थ पवार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वास देवकाते, बारामती बँकेचे अध्यक्ष सचिन सातव यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते.

> **नागरिकात कमालीचा उत्साह...**
>
> **» राष्ट्रवादीत दोन गट पडल्यानंतर अजित पवार प्रथमच बारामतीत आलेले होते, त्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांचे बारामतीकरांनी केलेल्या भव्य स्वागताची राजकीय वर्तुळात चर्चा होती. नागरिकांनी उत्साहाने त्यांचे स्वागत करत त्यांना पाठिंबा दर्शविला.**

उपमुख्यमंत्रीपदी निवड झाल्यानंतर अजित पवार यांची ही पहिलीच बारामती भेट असल्याने कार्यकर्ते, नागरिक, व्यापारी, संस्था आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे पुष्पहार, पुष्पगुच्छ देत स्वागत केले. जेसीबी यंत्राच्या मदतीने अनेक ठिकाणी त्यांच्यावर फुलांची उधळण केली गेली. क्रेनद्वारेही त्यांना पुष्पहार घातले गेले. अजित पवार यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर बँड, ढोलपथकाच्या निनादात त्यांची मिरवणूक काढण्यात आली. संतोष गालिंदे आणि सहकाऱ्यांनी अजित पवार यांच्यावर दोन टनांहून अधिक फुलांची उधळण केली. मिरवणुकीच्या मार्गावर ठिकठिकाणी स्वागतकमानी लावून व्यापारी वर्गाने अजित पवार यांचे स्वागत केले. तालुक्याच्या विविध भागांतून तरुण दुचाकी रॅली काढून बारामतीच्या शारदा प्रांगणात दाखल झाले होते. राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संभाजी होळकर, शहराध्यक्ष जय पाटील, युवकाध्यक्ष अविनाश बांदल यांच्यासह अनेक सहकाऱ्यांनी या सत्कार सोहळ्याचे नियोजन केले होते.

# गावांचा विकास लांबणीवर!

## आराखडा प्रसिद्ध करण्यास पुन्हा मुदतवाढ

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या ११ गावांचा विकास आराखडा प्रसिद्ध करण्यासाठी पुन्हा मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने केला आहे. मुदतवाढीचा तसा ठराव मंजुरीसाठी महापालिकेच्या शहर सुधारणा समितीपुढे ठेवण्यात आला असून, १ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढीचा हा प्रस्ताव आहे. शहर सुधारणा समिती आणि मुख्य सभेच्या मान्यतेनंतर हा प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे समाविष्ट गावातील विकास पुन्हा लांबणीवर पडणार आहे. महापालिका हद्दीत ४ ऑक्टोबर २०१७ मध्ये ११ गावांचा समावेश करण्यात आला. लोहगाव आणि मुंढव्यातील उर्वरित




भाग, साडेसतरानळी, उत्तमनगर, शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रूक, फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही गावे पुणे महापालिकेमध्ये समाविष्ट झाली. त्यानंतर जवळपास एक वर्षाने म्हणजे ४ डिसेंबर २०१८ रोजी या गावांचा विकास आराखडा तयार करण्याचा इरादा महापालिकेने प्रसिद्ध केला होता. त्याला २१ डिसेंबर २०१८ रोजी महापालिकेच्या मुख्य सभेने मान्यता दिली. मात्र, सन २०१९ मधील लोकसभा, विधानसभा तसेच वाढीव हद्दीतील पोटनिवडणुकीमुळे विकास आराखडा प्रसिद्ध करण्यास विलंब झाला. त्यानंतर २०२० पासून करोना संसर्ग सुरू झाल्याने प्रारूप विकास आराखड्याचे काम ठप्प झाले. करोना संसर्ग नियंत्रणात आल्यानंतर आरक्षण निश्चिती, जमीन वापराचे नकाशे आणि त्याचा अहवाल करण्याचे काम पूर्ण करण्यात आले. विकास आराखडा जाहीर करण्याची मुदत संपुष्टात आल्याने महापालिकेने मुदतवाढ द्यावी, असा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविला. राज्य शासनाने ज्या प्रस्तावाला २५ जून २०२३ पर्यंत मुदतवाढ दिली. या कालावधीतही तो पूर्ण होऊ न शकल्याने आता पुन्हा १ मार्च २०२४ पर्यंतची मुदतवाढ राज्य शासनाकडे मागण्यात आली आहे. तसा प्रस्ताव शहर सुधारणा समितीपुढे ठेवण्यात आला आहे. या गावांमध्ये अद्यापही प्रादेशिक आराखडाच लागू आहे. राज्यात सर्वत्र एकात्मिक बांधकाम नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी होत असताना या गावांमध्ये त्याची अंमलबजावणी होत नसल्याने विकासाला त्याचा फटका बसत आहे. हस्तांतरण विकास हक्क (टीडीआर) वापरून बांधकाम करण्यासही मर्यादा येत आहेत

# अखेर रेल्वे प्रशासन हलले!

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** प्रवाशांसाठी पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारात उभारण्यात येणाऱ्या आपत्कालीन वैद्यकीय कक्ष आता पूर्वनियोजित जागीच होणार आहे. एका अधिकाऱ्याच्या विरोधामुळे ही चांगली योजना गुंडाळण्याची वेळ आली होती. 'लोकसत्ता'ने वृत्त दिल्यानंतर मध्य रेल्वे प्रशासनाने अखेर आधी ठरलेल्या जागीच हा कक्ष उभारण्याचा निर्णय शुक्रवारी घेतला. पुणे स्थानकावरील आपत्कालीन वैद्यकीय कक्षाच्या उभारणीचे कंत्राट रुबी हॉल रुग्णालयाला देण्यात आले. रेल्वे पोलीस दलाच्या (आरपीएफ) वाहनतळाच्या जागेत हा कक्ष उभारण्याचे निश्चित झाले होते. याबाबत नुकतेच रुबी हॉलचे पथक पाहणीसाठी स्थानकावर आले. त्यावेळी रेल्वे पोलीस दलाच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना पिटाळून लावले. नंतर हा प्रकार वरिष्ठांच्या कानावर गेला. त्यावेळी वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त उदयसिंह पवार यांनी हा विरोध केल्याचे समोर आले. विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे यांनी निर्णय घेतलेला असतानाही हा विरोध करण्यात आला होता. याबाबत 'लोकसत्ता'ने वृत्त वस्तुस्थिती मांडली होती. यानंतर रेल्वे प्रशासनाने तातडीने शुक्रवारी निर्णय घेत आधी ठरलेल्या जागीच आपत्कालीन वैद्यकीय कक्ष उभारण्याचा निर्णय घेतला.हा कक्ष पुणे स्थानकाच्या आवारात असलेल्या रेल्वे पोलीस दलाच्या वाहनतळाच्या जागेत उभारण्यात येणार आहे. त्याला रुबी हॉल रुग्णालयाने संमती दर्शविली आहे. यामुळे रेल्वे स्थानकात आपत्कालीन प्रसंगी प्रवाशांना वैद्यकीय सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'पुणे स्थानकावर रेल्वे पोलीस दलाच्या वाहनतळाच्या जागेत आपत्कालीन वैद्यकीय कक्ष उभारण्यात येणार आहे